**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०२३ मध्ये निशाण २० वरील आदेश.</u>**

अर्जाचे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज निशाण ०१ कडे दुरूस्ती करण्यासाठी *दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर VI नियम १७* प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जातील वादीचे कथनानुसार सदरचा दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमूद केलेल्या दुरूस्ती दाव्यात करण्याची मागणी करताना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. ७ ते ५१ तर्फे मुखत्यार राजेश रामभाऊ मोहिते यांनी 'हरकत नाही' असे म्हणणे दिले.

**०४.** अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत अर्ज, अभिलेख व युक्तीवाद ऐकल्यानंतर येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुतचा दावा वाटपासाठी वादीने दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये कोणत्याही तांत्रीक त्रुटी राहू नयेत यासाठी वादीने अर्जात नमूद प्रमाणे दुरूस्ती मागितलेली आहे. दाव्यामध्ये कोणतीही तांत्रीक त्रुटी राहू नये यासाठी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. तसेच कार्यबाहुल्य टाळण्यासाठी दुरूस्ती करणे न्यायोचित ठरते. सदरच्या दुरुस्तीमूळे प्रतिवादी यांना एकंदर कोणतेही नुकसान होणार नाही उलटपक्षी दावा गुणदोषावर चालविण्यास मदत होणार आहे असे दिसून येते.

**०६.** वर नमूद कारणमिमांसेचा विचार करता वादी यांनी केलेल्या अर्जानुसार मागीतलेली दुरुस्ती ही दोन्ही पक्षकारांमध्ये असलेला वाद गुणदोषांवरती निकाली करण्यासाठी गरजेची आहे. दुरुस्तीचे आदेश करताना न्यायालयाने उदार विचार करणे गरजेचे आहे. सदरचे कृत्य हे खर्चास पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रू. ३००/- इतकी कॉस्टची रक्कम सरकार जमा करणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मागितलेली प्रस्तावित दुरूस्ती या आदेशापासून १४ दिवसांचे आत दाव्याकामी वर नमूद कॉस्टची रक्कम भरून करून घ्यावी व त्याची प्रत

प्रतिवादी यांना पुरवावी.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.03.30 10:42:21 +0530

दिनांक :२५/०३/२०२६

(एस. आर. जोशी)

ठिकाण–लांजा

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लांजा

ता. लांजा,जि.रत्नागिरी

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 25/03/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 25/03/2026 |
| Order uploaded on | :- | 30/03/2026 |